CoverageReport: TCS IT Wiz – Nagpur Edition

**Publication:**Deshonnati
**Date:** 20/09/2014
**Edition:** Nagpur
**Page No:** 3
**Headline:**Center Point School, wins Nagpur edition of TCS IT WIZ

# 'आयटी विझ'मध्ये सेंटर पॉईंटच्या विद्यार्थ्यांची बाजी

## महाअंतिम फेरीत करणार नागपूरचे प्रतिनिधित्व

*प्रतिनिधी / १९ सप्टेंबर*

**नागपूर :** माहिती तंत्रज्ञान सेवा, सल्ला व व्यावसायिक सुविधा प्रदान करणारी कंपनी टाटा कंन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) आयटी विझ या आंतरशालेय आयटी क्विझ देशातील विविध शहरात आयोजित करण्यात येत आहे. त्यानिमित्ताने आज १९ सप्टेंबर रोजी डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात झालेल्या टीसीएस आयटी विझ २०१४ च्या नागपूर फेरीत अखेरच्या क्षणापर्यंत रोमहर्षक ठरलेले विजेतेपद सेंटर पॉईंट स्कूलचे अनिरुद्ध मोरारका व शौविक यांनी पटकावले. यावेळी विजेते ठरलेले विद्यार्थी महाअंतिम फेरीत नागपूरचे प्रतिनिधित्व करणार आहेत, हे विशेष.

बुद्धीचा कस पाहणारे, रोचक फ्लिपबोर्डिंग, ड्रोनिंग, डिस्रप्टीव थिंकिंग, सो-लो-मो (सोशल-लोकल-मोबाईल) सॉफ्टवेअरवर प्रश्न विद्यार्थ्यांना विचारण्यात आले होते. यात सोमलवार स्कूलच्या संजना व धनाडा सहभागी झाल्या. भवन्स विद्यामंदिरमधून कार्तिक पाटील, लक्ष्य माहेश्वरी, गुरू हरीकिशन पब्लिक स्कूलचे कुणाल वासनिक, दिलप्रीत सिंग, सेंटरपॉईंट स्कूल काटोल रोडचे अनिरुद्ध मोरारका व शौविक, एसएफएस ज्युनिअर कॉलेज सेमिनरी हिल्सचे राहुल भगत व दिनेश नायर तर दिल्ली पब्लिक स्कूलचे पार्थ मिश्रा व अश्विन कोटपल्ली सहभागी झाले होते. प्राथमिक लेखी परीक्षेत सर्व संघांना स्पर्धेच्या ठिकाणी २० प्रश्न सोडवायला दिले होते. यात यशस्वी ठरलेल्या सहा उत्कृष्ट संघांना विभागीय फेरीत सहभागी होण्याची संधी मिळाली होती. सर्वप्रथम फ्लिपबोर्डिंग फेरी घेण्यात आली. त्यात संघांना थेट प्रश्नाचे उत्तर देण्याचा किंवा अधिक सोप्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी आधी विचारलेला प्रश्न फ्लिप करण्याचा पर्याय देण्यात आला. परंतु, या आधीचा प्रश्न फ्लिप केल्यानंतर येणाऱ्या दुसऱ्या सोप्या प्रश्नाला कमी गुण देण्यात आले. दोन्ही प्रश्नाचे उत्तर न आल्यास तो प्रश्न दुसऱ्या संघाला विचारण्यात आला. त्यात सोमलवार स्कूल सोडून सर्वांनी उत्तर दिले. त्यानंतर ड्रोनिंग फेरी घेण्यात आली. त्यात ड्रोन्सची सुरुवात झाल्यापासून पुरवठा शृंखलेच्या बाबतीत अनेक वेगवान बदल झाले आहे. यापासून प्रेरणा घेत प्रश्न तयार करण्यात आले. या फेरीत जगातील काही देशांची निवड करून त्यावर संघांना प्रश्न विचारण्यात आलेत. त्यातही सोमलवार स्कूल वगळता सर्व शाळांच्या विद्यार्थ्यांनी योग्य उत्तर दिले. त्यानंतर डिस्रप्टीव थिंकिंग या फेरीत बझर राउंड घेण्यात आला. ज्या संघाला उत्तर येईल त्यांनी तेवढ्या लवकर बझर दाबून उत्तर द्यायचे होते. तर शेवटी सोशल-लोकल-मोबाईल (सो-लो-मो) वर सुद्धा बझर राउंड घेण्यात आला. त्यात सामाजिक, स्थानिक व मोबाईलसंबंधी प्रश्न विचारण्यात आले. त्यात शेवटपर्यंत सेंटर पॉईंट स्कूल काटोल रोड व एसएफएस ज्युनिअर कॉलेजच्या संघात काट्याची टक्कर होती.

शेवटपर्यंत दोन्ही संघाचे गुण सारखे होते. परंतु, शेवटचा प्रश्न विचारताच सेंटर पॉईंटने क्षणाचा विलंबही न करता बझर दाबून उत्तर दिले. यात सोमलवार स्कूल खामला संघाला ० गुण, भवन्स विद्यामंदिरच्या संघाला १० गुण, गुरू हरीकिशन पब्लिक स्कूलच्या संघाला २५ गुण, सेंटर पॉईंट स्कूल काटोल रोडच्या संघाला ५५ गुण, एसएफएस ज्युनिअर स्कूलच्या संघाला ४५ गुण व दिल्ली पब्लिक स्कूलच्या संघाला ४५ गुण मिळाले होते. विजेत्या संघाला टीसीएस बीपीएस सर्व्हिसेसचे उपाध्यक्ष व ग्लोबल एचआर हेड राजन बंडोपाध्याय यांच्या हस्ते बक्षिसांचे वितरण करण्यात आले.

